उल्हासनगर महानगरपालिका
मालमत्ता कर विभाग
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर- ४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104


जा. क्र. उमपा/कर विभाग/ ३.१/५६
दिनांक १८ जुलै, २०२३

विषय---महाराष्ट्र शासनाच्या नावावर असलेल्या शासकीय भुखंडावर भ्रष्ट मार्गाने व बोगस कागदाद्वारे भुमाफियांच्या नावे करपावती (हाऊस टॅक्स) लावल्याबाबत.

संदर्भ---श्री योगीराज देशमुख, विभाग अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-४२१ ००१ यांचेकडील दिनांक २६/०५/२०२३ रोजीचे पत्र

## प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयांकित प्रकरणी, उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मालमत्ता क्रमांक | कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर निर्धारण वर्ष | बांधकाम प्रकार | वापर | क्षेत्रफळ चौ.फुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३एओ०१४११९९०० | पमनदास मंगलदास गंगवानी | कमला नेहरु धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | पत्रेविटा<br>मोकळी जागा | अनिवासी<br>अनिवासी | २५५<br>५७३० |
| २ | ०३एओ०२१८६५८०० | सन्नी किसन पवार | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-२०२० | पत्रेविटा | निवासी | १५० |
| ३ | ०३एओ०१४११९८०० | शंकर रायलदास लुंड | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ११५८४<br>११७ |
| ४ | ०३एओ०१४१२०१०० | किशनचंद पी गंगवानी | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ५४२७<br>४१४ |
| ५ | ०३एओ०१४१२०००० | किशनचंद पेसुमल सचदेव | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | मोकळी जागा<br>पत्रेविटा | अनिवासी<br>अनिवासी | ११३२६<br>३७४ |
| ६ | ०३एओ०१४१२०३०० | महिंदर एस पुरस्वानी | कमला नेहरु नगर, धोबीघाट, उल्हासनगर-१ | ०१-०४-१९९१<br>०१-०४-१९९१ | पत्रेविटा<br>मोकळी जागा | अनिवासी<br>अनिवासी | २६६<br>११४३४ |
| ७ | ०३एओ०२१४२३६०० | अलका कैलास वाघचौरे | कमला नेहरु नगर, धोबीघाट, पांडे बिल्डींग मागे, उल्हासनगर-१ | १६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१६-१२-२०१७<br>१८-०२-२०२१ | पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>पत्रेविटा<br>मोकळी जागा<br>पत्रेविटा | निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी<br>निवासी | १०५<br>१६५<br>३५<br>८०<br>२०<br>१२०<br>४५० |

श्री योगीराज देशमुख यांनी महाराष्ट्र शासनाचा भुखंडावर बोगस कागदपत्राद्वारे व खोटया दस्तऐवजाच्याद्वारे करपावत्या (हाऊस टॅक्स) बनवून दिल्या आहेत सदर भुखंडावर महाराष्ट्र शासनाचा फलक असून सदरचा फलक हा मा जिल्हाधिकारी यांचेतर्फे लावण्यात आलेला असताना सुध्दा सदर काही जागेवर शेड टाकुन त्यांच्या कर पावत्या काढण्यात आलेल्या असल्याने सदरच्या कर पावत्या (मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६००) रदद करणेबाबत दिनांक २६/०५/२०२३ रोजीचे अर्जान्वये तक्रार दाखल केली आहे. सोबत महाराष्ट्र शासनाकडील मालमत्ता पत्रकाची प्रत (हक्काचा मुळ धारक-- महाराष्ट्र शासन, नगर भूमापन क्रमांक ७९१, ७९२/अ, ७९३/अ, ७९५, ७९६, ७७२, ८११, ८१२, ८१३, ८१४, ८१५, ७९०, ७८९, ७८८, ७८७, ७८६, ७८५) सादर केली आहे.

श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर निरीक्षक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरील जागा शासनाचे मालकीची असल्याने यावर अतिक्रमण केल्यास कायदेशिर कारवाई करण्यात येईल, असा महाराष्ट्र शासनाचा फलक लावण्यात आलेला आहे. सोबत छायाचित्र जोडत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडील मालमत्ता पत्रकात (हक्काचा मुळ धारक-- महाराष्ट्र शासन, नगर भूमापन क्रमांक ७९१, ७९२/अ, ७९३/अ, ७९५, ७९६, ७७२, ८११, ८१२, ८१३, ८१४, ८१५, ७९०, ७८९, ७८८, ७८७, ७८६, ७८५) सदरील जागा महाराष्ट्र शासनाच्या नावे आहे. तसेच उक्त मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करणेसंबंधी कोणतेही कायदेशिर कागदपत्रे कर विभागात उपलब्ध नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात आलेल्या सेवा सुविधांच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या मालमत्तांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी व वसुली करण्यात येते. मालमत्ता कर वसुलीकरीता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोद आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात फक्त मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही.

त्याअनुषंगाने श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेला अर्ज व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन **महाराष्ट्र शासन** अशी नोंद वर्ष २०२३-२०२४ पासुन करणेसाठी शिफारस करण्यात आली आहे

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

श्री योगीराज देशमुख यांनी दाखल केलेला अर्ज व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे मालमत्ता पत्रकाच्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्रमांक ०३एओ०१४११९९००, ०३एओ०२१८६५८००, ०३एओ०१४११९८००, ०३एओ०१४१२०१००, ०३एओ०१४१२००००, ०३एओ०१४१२०३००, ०३एओ०२१४२३६०० अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर देण्यास प्रथमत पात्र व्यक्ती म्हणुन महाराष्ट्र शासन अशी नोंद वर्ष २०२३-२०२४ पासुन करावी

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत-
मे काल्म्रो ग्रुप